राज्यसेवा मुख्य परीक्षा - 2012

2074

**XOO**

# विषय : मराठी (अनिवार्य)

***दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा*** — ***एकूण गुण : 100***

***प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक*** — ***कालावधी : 3 तास***

**सूचनाः** *(1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

*(2) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*

*(3) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्न संख्ये इतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(4) तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*

*(5) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल .*

**1.** पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 500 शब्दांचा निबंध लिहा : *15*

(अ) कुपोषण – एक समस्या ?

(ब) पेट्रोल-डिझेल संपले तर.

(क) मी सीमेवरील सैनिक बोलतोय.

**2.** (अ) पुढे दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दात अर्ज लिहा. *5*

प्रेषित आचार्य यास चित्रकलेची अत्यंत आवड आहे त्याला चित्रकलेत पदवी शिक्षण घ्यायचे आहे. 'सरस्वती चित्रकला महाविद्यालय सेलू जि. परभणी' येथील प्राचार्यांना प्रवेश मिळण्याविषयी विनंती अर्ज लिहा.

(ब) पुढे दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दात सभेचा अहवाल लिहा. *5*

विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्था फलटणच्या संचालक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 11-2-2012 रोजी संपन्न झाली. त्या सभेचा अहवाल लिहा.
(सभेचे अध्यक्ष : आनंदराव बिडकर.)

(क) पुढे दिलेल्या माहितीच्या आधारे मुलाखतीच्या वेळी झालेला संवाद सुमारे शंभर शब्दात लिहा. वाळू उत्खननामुळे नद्यांची पात्रे कोरडी पडली. या पार्श्वभूमीवर वन मंत्री मा. पतंगराव कदम यांची मदन पवार यांनी घेतलेली मुलाखत संवादरूपाने लिहा. *5*

3. (अ) पुढे दिलेल्या माहितीच्या आधारे निमंत्रण पत्रिका तयार करा. नगर परिषद कागल, जि. कोल्हापूर यांनी नव्याने बांधलेल्या जलतरण तलावाचे उद्‌घाटन जलतरणपटू वीरधवल खाडे यांच्या हस्ते दि. 15.9.2012 रोजी दुपारी 4.00 वाजता होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. आमदार धनंजय लामधाडे हे आहेत. *5*

(ब) पुढे दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे पन्नास शब्दात अभिनंदनपर पत्र लिहा. *5*

भारतीय क्रिकेट संघात उमेश शहाणे याची निवड झाली आहे. त्याची मैत्रिण रमाताई चंदने, समर्थनगर जुन्नर, जि.पुणे ही अभिनंदनपर पत्र पाठवित आहे.

(क) पुढे दिलेल्या माहितीच्या आधारे प्रसारमाध्यमासाठी आवाहनाचा मजकूर सुमारे शंभर शब्दात लिहा. *5*

पोलीओ लसीकरण मोहिमेस भरघोस प्रतिसाद देण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांच्यावतीने नागरिकांना आवाहन करण्यात येते.

4. (अ) खालील विषयावर औपचारिक भाषणाचा मजकूर सुमारे शंभर शब्दात लिहा. *5*

श्री. सय्यद सलीम हे नगरपरिषद रावेर जि. जळगांव येथे मुख्याधिकारी पदी नव्याने रूजू झाले. त्यांच्या स्वागत समारंभ प्रसंगी केलेल्या भाषण.

(ब) खालील माहितीच्या आधारे दोन व्यक्तींतील संवाद सुमारे शंभर शब्दात लिहा. *5*

मराठी माध्यमाच्या शाळांची स्थिती

(क) खालील विषयावर झालेल्या गटचर्चेचा संवादात्मक मजकूर सुमारे शंभर शब्दात लिहा. *5*

इंटरनेट वापराचे परिणाम

5. (अ) पुढे दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे सरळ, सोप्या मराठीत भाषांतर करा. *5*

We are now a great and free nation. We are our own masters and our future is in our hands. We elect our representatives to govern ourselves for the welfare of the whole nation. As citizens, we have our rights. But we have our duties also. We cannot only enjoy our rights and neglect our duties. Our first duty is to preserve our freedom and to work for the welfare of the people.

(ब) खाली दिलेल्या उताऱ्याचा आशय सरळ, सोप्या मराठी भाषेत 100 शब्दांत लिहा. *5*

साने गुरुजी म्हणत असत, 'मुले ज्याच्याभोवती पिंगा घालतात तो शिक्षक चांगला !' अंमळनेरच्या शाळेत काय किंवा पुढे महाराष्ट्रात काय, गुरुजींच्या भोवती शेकडो मुलं गुळाच्या ढेपीभोवती मुंगळे जमावेत तशी जमत असत आणि मग प्रभूशी नातं जोडण्याच्या भक्तीनं गुरुजी त्या मुलांना गोष्टी सांगत असत. त्यांना रिझवित असत. हसवीत असत. त्यांच्या हृदयातील करुणा जागवीत असत. त्यांना आनंदविभोर करुन टाकत असत ! गोष्ट लहान पण तिची शक्ती महान ! हे गोष्टीतील मर्म गुरुजींनी पूर्णपणानं जाणलं होतं. शिक्षण, संस्कार, शुभदृष्टी, भलंवळण, एकूण व्यक्तिमत्व विकासातील गोष्टींचं साधन किंवा माध्यम केवढं प्रभावी आहे, हे त्यांनी चांगलं ओळखलं होतं. हसत-खेळत सांगीतलेल्या गोष्टींतून मूल जेवढं शिकतं, तेवढं उपदेशाचे घुटके देणाऱ्या उपदेशपर व्याख्यानातून आणि तात्पर्य सांगणाऱ्या धडयांतून शिकत नाही. बालांची ही आनंद-प्रवृत्ती त्यांनी हेरलेली होती. गोष्टींप्रमाणेच गाणी, खेळ, संगीत, नृत्य, नाट्य, चित्र इत्यादी बालांना प्रिय असणाऱ्या आनंद-प्रवृत्तींवरही शिक्षणात भर असायला हवा, असं त्यांचं मत होतं, त्यांनी लिहिलेल्या एका सुंदर पत्रात एके ठिकाणी ते म्हणतात, "शाळांतून असे नाट्यप्रवेश वरचेवर व्हावेत. त्यामुळे भावना वाढतात. कलासंवर्धन होते. शिक्षकांनी देखील त्यात सामील व्हावे. महान शिक्षणतज्ज्ञ गिजुभाई बधेका मुलांबरोबर नाटकात काम करायचे. रवींद्रनाथ ही करीत. मुलांमधे मिळून-मिसळून पुन्हा एकप्रकारे अलिप्त राहण्याची कला खऱ्या शिक्षकाजवळ असायला हवी."

निसर्गाचा आणि मुलांचा सतत संबंध, सतत सान्निध्य, याला साने गुरुजी फार महत्व देत असत. निसर्गप्रेम, मानवेतर सृष्टीशी मैत्री व मानवतेच्या प्रेमधर्माची शिकवण या गोष्टींचा त्यांनी रवींद्रनाथांप्रमाणेच सतत उद्घोष केलेला आहे. सदैव पुरस्कार केलेला आहे. गुरुजींची शैक्षणिक दृष्टी अशी होती. गुरुजींचं निसर्गशिक्षण असं होतं. त्यांच्या दृष्टीने सृष्टीतील महाकाव्य म्हणजे समुद्र ! ह्या सृष्टीवैभवानं वैभवी बनविणारं शिक्षण त्यांना प्रिय होतं. पण या सौंदर्यासक्त मनाला श्रमाची श्रेष्ठता, महत्ता कळली पाहिजे व श्रमशिक्षणाचीही जोड शिक्षणात असली पाहिजे, असं गुरुजींना वाटे.

**6.** (अ) खाली दिलेला उतारा वाचून 1/3 शब्दांत सारांशलेखन करा व त्यास योग्य शीर्षक द्या. *5*

समाज आणि स्त्री यांच्यातील अन्योन्य संबंधांवर बसवेश्वरांनी भाग्य केलेले आहे. समाजोद्धारासाठी स्त्रीयोद्धार अपरिहार्य असल्याचा विचार त्यांनी प्रतिपादन केलेला आहे. सुशिक्षित आणि सुसंस्कृत समाजच स्त्री-पुरुष समानतेला आणि स्त्री-उद्धाराला अनुकूल असतो. समाजाचा उद्धार तसेच स्त्रीचा उद्धार घडवून आणण्याचे सामर्थ्य शिक्षणात असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केलेला आहे. ''विद्या हेच मानवधर्माचा उद्धार करणारे तत्त्व होय'' असे बसवेश्वरांनी म्हटले आहे. स्त्री-शिक्षणप्रसार, स्त्रीयांच्या सामाजिक संघटना, स्त्रीयांसाठीची प्रशिक्षण केंद्रे, बालविवाहास विरोध, विधवाविवाहास मान्यता, असहाय स्त्रीयांकरिता कार्यशाळा, देवदासी व वेश्यांकरिता पुनर्वसन संस्था, 770 सदस्य असलेल्या 'अनुभव मंटप' या सामाजिक संस्थेच्या विविध विषयांवरील चर्चासत्रांतील स्त्री-सदस्यांचा सहभाग, स्त्रीयांची वाङ्मयनिर्मिती इत्यादि अनेक गोष्टींच्या संदर्भात बसवेश्वरांनी प्रोत्साहनात्मक विचार मांडून त्यासाठी अनेक योजनाही कार्यान्वित केल्या.

जगातल्या सर्व धर्मप्रेषितांनी स्त्रीकडे काहीसे गौण भावनेने पाहिलेले आहे. त्यामुळे सर्व समाजामध्ये स्त्रीसम्बन्धी अनेक प्रकारच्या काहीशा चुकीच्या प्रथा-परंपरा रुढ झाल्या आहेत. विशेषतः गरोदरपण, बाळांतपण व ऋतुकाळातील विटाळशीच्या कल्पनेमुळे स्त्रीला 'अयोग्य' व 'अपवित्र' मानून काही बंधने लादलेली आहेत. देवघरात प्रवेश करु नये, पूजा करु नये, वेदादि धर्मग्रंथांचे वाचन करु नये, मंदिर प्रवेश करु नये, धार्मिक विधि संस्कारात सहभाग घेऊ नये अशा अनेक प्रथा जपण्याची आजही प्रवृत्ती दिसते. दक्षिण भारतातल्या कार्तिक स्वामीच्या कित्येक मंदिरात, महाराष्ट्रातल्या अनेक मारुती मंदिरात तसेच इतरही काही मंदिरात स्त्री-प्रवेशास मनाई असते. या 21 व्या शतकात देखील असे प्रकार घडतात. हे एक सामाजिक दुर्दैव होय.

बसवेश्वरांनी स्त्रीविषयक गौणत्व प्रवृत्तीला तसेच सर्व प्रकारच्या अंधप्रथांना विरोध केलेला आहे. बसवेश्वरांच्या मते, स्त्री ही कोणत्याच बाबतीत पुरुषापेक्षा कमी अथवा गौण असू शकत नाही. बसवेश्वरांच्या स्त्रीविषयक समतावादी दृष्टीकोनावर भाष्य करताना डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, ''भारतीय समाजात स्त्रीच्या कपाळी शतकानुशतके गुलामगिरीच लिहिली गेली. माता, भगिनी, पत्नी आणि कन्या या नात्यांनी पुरुषांच्या जीवनात वावरणारी स्त्री नेहमीच पुरुषांपेक्षा कनिष्ठ प्रतीची मानली गेली. स्त्रीचा उल्लेख प्राचीन काळापासून शूद्रांच्या बरोबरीनेच केला गेला. धर्माच्या नावाखाली तिच्यावर बंधने घालण्यात आली होती. स्त्रीच्या जीवनाला व व्यक्तिमत्वाला पुरुषाइतकीच प्रतिष्ठा आहे. पुरुषाहून स्त्री कोणत्याही अर्थाने कमी दर्जाची असत नाही. स्त्री-पुरुष समान आहेत, असा उद्घोष बसवेश्वरांनी केला आणि स्त्रीच्या ठायी असलेल्या शक्तीची, बुद्धीची, प्रतिभेची व कर्तृत्वाची जाणीव साऱ्या समाजाला करुन दिली.''

(ब) दिलेला उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा. 5

आपण हल्लीच्या काळात बधतो की मुलं कमी वाचतात. आता या मागची कारणं जर शोधायला गेलो तर चटकन पहिली गोष्ट लक्षात येते की, मुलांना खेचून होणारं, मंत्रमुग्ध करणारं वाङ्मय आज आपल्याकडे पुरेशा प्रमाणात तयारच होत नाही. मुलांकरताच साहित्य म्हटलं की पौराणिक त्यातही रामायण-महाभारत आदर्श-ऐतिहासिक आणि कुमारवयातल्या मुलांकरता थोडयाफार प्रमाणात वैज्ञानिक, समाजसेवकांच्या गोष्टी, साहसकथा इत्यादी गोष्टी नजरे-समोर येतात. हल्लीच्या मुलांवर ठोकळेबाजपणे त्याच त्या पौराणिक कथा आपल्याला आता थोपवता येणार नाहीत. त्यातून सकस जीवनमूल्य देणाऱ्या ज्या काही कथा आहेत त्यांची निवड होणं आवश्यक आहे. ऐतिहासिक कथांच्याही बाबतीत थोडयाफार फरकाने हेच म्हणावं लागेल. वैज्ञानिक किंवा समाजसेवकांचे जे आदर्श आपण मुलांच्या डोळ्यापुढे आजकाल साहित्यातून मांडतो त्याची शैली मला तरी मुलांच्या दृष्टीने अतिशय नीरस क्लीष्ट वाटते. सहज सोप्या भाषेत, चार-दोन घटनांच वर्णन करुन आकर्षक पद्धतीने या कथा लिहल्या जायला हव्यात. खेरीज भारतभरच्या आणि जगभरातल्याही पारंपरिक लोककथांचा खजिना आज उपलब्ध आहे. त्यातूनही निवड करुन उत्तम कथा मुलांकरता द्यायला हव्यात. याच सोबत मुलांच्या आजूबाजूचा निसर्ग, परिसर, त्यांच दैनंदिन आयुष्य यांच्याशी ओळख दाखविणारं साहित्यही नव्याने निर्माण करण्याची गरज आहे. वेगवेगळ्या वयोगटातल्या मुलांकरता बालसाहित्य निर्मितीचे निकष लावायला हवेत.

हे सगळं झालं तर मुलं निश्चित पुस्तकांकडे आकर्षित होतील. याचबरोबर पालकांनी वाचनाकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन बदलण्याची अत्यंत गरज आहे. वाचन ही एक आनंदाची गोष्ट आहे हे आपण मुलांना पटवतो का ? अभ्यासाव्यतिरिक्त बरंच काही मुलांनी वाचायला हवं हे मुळात पालकांना पटतं का ?

(i) मुलांचे वाचन कमी असण्याची कारणे कोणती ?

(ii) मुलांसाठी कथा निवडताना कोणती काळजी घ्यावी ?

(iii) कथालेखन करताना कशास महत्व द्यावे ?

(iv) मुलांचे वाचन वाढविण्यासाठी काय करावे लागेल ?

(v) उताऱ्यास योग्य शीर्षक सुचवा.

**7.** (अ) खालील शब्दांच्या जाती ओळखा. (कोणत्याही ***चार***) 2

(i) काटेरी

(ii) पाहिले

(iii) परंतु

(iv) नदी

(v) हळूहळू

(ब) पुढील शब्दांची कंसात दर्शविल्याप्रमाणे रूपे लिहा. (कोणतेही ***सहा***) 3

(i) पिसू (अनेकवचन)

(ii) बुधली (पुल्लिंग)

(iii) कुबड (विशेषण)

(iv) दिवस (क्रियाविशेषण)

(v) उठ (क्रियापद)

(vi) गणित (विशेषण)

(vii) गाडा (स्त्रीलिंग)

(viii) मनुष्य (भाववाचक नाम)

(क) खालील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात रूपांतर करा. (कोणतेही ***पाच***) 5

(i) तू पहिला क्रमांक मिळव. मी बक्षीस देईन. (केवल वाक्य करा.)

(ii) शेतीचे उत्पन्न मिळेल. मी मोटार घेईन. (मिश्रवाक्य करा.)

(iii) मला रात्रीचा प्रवास आवडतो. (नकारार्थी करा.)

(iv) मला भूक नाही. मी जेवणार नाही. (संयुक्त वाक्य करा.)

(v) गांधीजींनी आंदोलन केले. देश स्वतंत्र झाला. (केवल वाक्य करा.)

(vi) व्यसन चांगले नसते. (होकारार्थी करा.)

(ड) खालील वाक्यांचे काळ ओळखा (कोणतेही ***चार***) 2

(i) दिनकर गावाला जात होता.

(ii) कुत्रा घराची राखण करील.

(iii) शेतकरी शेत नांगरत आहे.

(iv) बाळ खेळून झोपला.

(v) तो मुलगा तबला वाजवित राहील.

8. (अ) खालील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे रूपांतर करा. (कोणतेही ***सहा***) *3*

(i) मी पळून जाईल. (रीती वर्तमानकाळ करा.)

(ii) त्याने अभ्यास केला. (पूर्ण भविष्यकाळ करा.)

(iii) संदीपने लेखन केले आहे. (अपूर्ण वर्तमानकाळ करा.)

(iv) गायिका सराव करते आहे. (भूतकाळ करा.)

(v) आगगाडी थांबली आहे. (काळ ओळखा.)

(vi) मंथनातून लोणी निघाले. (भविष्यकाळ करा.)

(vii) प्रवासी चालत असेल. (भूतकाळ करा.)

(viii) झाड वाढत होते. (वर्तमानकाळ करा.)

(ब) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. *1*

(i) पारा चढणे.

(ii) चेहरा काळवंडणे.

(क) खालील म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही ***चार***) *2*

(i) हाजीर तो वजीर.

(ii) पाचा मुखी परमेश्वर.

(iii) कोल्हा काकडीला राजी.

(iv) भित्यापाठी ब्रम्हराक्षस.

(v) कोळसा उगाळावा तितका काळाच.

(ड) खालील इंग्रजी पारिभाषिक शब्दांचे मराठी पर्यायी शब्द लिहा. (कोणतेही ***चार***) *2*

(i) Accurate

(ii) Humble

(iii) Loyal

(iv) Senator

(v) Maximum